श्री.जयदिप डाकरे सर श्री.प्रविण डाकरे सर

माझा अभ्यास

Study From Home

गुरुमाऊली

एक शैक्षणिक व्यासपीठ

Subscribe

इयत्ता – पाचवी (31 जुलै) माझा अभ्यास

Subscribe

शासनाच्या 45 दिवसाच्या ब्रीज कोर्ससोबत माझा अभ्यास PDF

शासनाच्या ब्रीज कोर्ससोबत क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा अभ्यासक्रम समाविष्ट

दिवस एकतीस :

CLICK HERE

टेस्ट सोडवा

मुंग्यांच्या जगात

पाठ वाचा व स्वाध्याय सोडवा.

उपक्रम : वेगवेगळे प्राणी, पक्षी वेगवेगळ्या कारणांसाठी एकमेकांशी संवाद साधतात. संवाद साधण्यासाठी ते काय काय करतात याचे परिसरात निरीक्षण करा. तुम्ही केलेले निरीक्षण वर्गात सांगा.

माहिती मिळवूया.

१. पाच कीटकांची चित्रे मिळवा. ती वहीत चिकटवा. प्रत्येक कीटकाविषयी चार-पाच वाक्यांत माहिती लिहा.

२. माणसे एकमेकांना संदेश पाठवण्यासाठी कोणकोणती माध्यमे वापरतात, याविषयी माहिती मिळवा. गटात एकमेकांना सांगा.

- खालील वाक्यांतील नामे ओळखा व सांगा.

(अ) बंडूची इजार चार बोटे लांब झाली.
(आ) आईने इजार एका कोनाड्यात फेकली.
(इ) माणसांप्रमाणे मुंग्या नक्कीच बोलत नाहीत.
(ई) आज कविता भारतातील अव्वल धावपटू आहे.

- खालील वाक्यांतील रिकाम्या जागी योग्य नामे घाला.

(अ) .... माधवला म्हणाली.
(आ) आंब्याच्या झाडावर .... लटकत होत्या.
(इ) घसरगुंडी खेळायला आम्ही .... गेलो.
(ई) .... विषय मला खूप आवडतो.
(उ) राष्ट्रपतींचे भाषण ऐकून .... मंत्रमुग्ध झाला.
(ऊ) महागाई वाढल्याने .... महागल्या.

खेळ खेळूया.

एकमेकांशी बोलताना आपण शब्दांचा वापर करतो. कधीकधी शब्दांचा वापर न करता एकमेकांशी बोलतो, तेव्हा आपण शरीराच्या वेगवेगळ्या अवयवांचा उपयोग करतो. कधी एकाच अवयवाचा उपयोग करतो, तर कधी दोन-तीन अवयवांचा उपयोग करतो.

उदा., मला खूप भूक लागली आहे, हे सांगताना आपण आपल्या हाताची बोटे एकत्र करून तोंडाजवळ नेतो व दुसरा हात आपल्या पोटावर ठेवतो, असा आपण मूक अभिनय करतो.

खालील वाक्ये वाचा व त्यांतील आशय न बोलता व्यक्त करा.

१. गप्प बस.	६. आई झोपली.
२. लिही.	७. लंगडी घाल.
३. चुकलो.	८. मला लाडू आवडत नाही.
४. नको.	९. होय.
५. फेक.	१०. पाणी हवंय.

शिक्षकांनी वर्गातील विद्यार्थ्यांचे दोन गट करावे. एका गटातील मुलाने वाक्य सांगावे व दुसऱ्या गटातील मुलाने त्या वाक्याच्या आशयानुसार कृती करावी. हा मूकाभिनयाचा खेळ घ्यावा.

खालील बेरीज व वजाबाकी करा.

3. बेरीज व वजाबाकी

टेस्ट सोडवा

सराव

या उदाहरणांमध्ये बेरीज आणि वजाबाकी या दोन क्रिया आहेत. ज्या क्रमाने क्रिया दिल्या आहेत, त्याच क्रमाने त्या करून उदाहरणे सोडवली आहेत. व्यवहारात कोणती क्रिया आधी करायची हे ठरवावे लागते.

उदा. (3) एका घराच्या बांधकामासाठी एकूण खर्च 87,14,530 रुपये आला. त्यांपैकी प्लॉटसाठी 24,72,615 रुपये व बांधकाम साहित्यासाठी 50,43,720 रुपये लागले आणि उरलेली रक्कम मजुरीसाठी खर्च झाली, तर मजुरीसाठी किती रक्कम लागली ?

रीत : 1

8714530 ⟶ एकूण खर्च
− 2472615 ⟶ प्लॉटची किंमत
6241915 ⟶ बांधकाम साहित्य व मजुरीचा खर्च

6241915 ⟶ बांधकाम साहित्य व मजुरीचा खर्च
− 5043720 ⟶ बांधकाम साहित्य खर्च
1198195 ⟶ मजुरीसाठी लागलेली रक्कम

रीत : 2

2472615 ⟶ प्लॉटची किंमत
+ 5043720 ⟶ बांधकाम साहित्य खर्च
7516335 ⟶ प्लॉट व बांधकाम साहित्याचा खर्च

8714530 ⟶ एकूण खर्च
− 7516335 ⟶ प्लॉट व बांधकाम साहित्याचा खर्च
1198195 ⟶ मजुरीचा खर्च

आपण दोन रीतींनी शोधलेले उत्तर बरोबर आहे ना ते ताळा करून पाहू.

2472615 ⟶ प्लॉटची किंमत
+ 5043720 ⟶ बांधकाम साहित्य खर्च
+ 1198195 ⟶ मजुरीचा खर्च
8714530 ⟶ एकूण खर्च

सर्व खर्चांची बेरीज करून मिळालेला एकूण खर्च दिलेल्या एकूण खर्चाशी जुळतो म्हणजे आपले उत्तर बरोबर आहे.

उदाहरणसंग्रह 13

1. वनविभागाने खैराची 23,078 झाडे, बेहड्याची 19,476 झाडे व उरलेली इतर प्रकारची झाडे लावली. जर वनविभागाने एकूण 50,000 झाडे लावली असतील, तर इतर प्रकारची किती झाडे लावली ?
2. एका शहराची लोकसंख्या 37,04,926 आहे. त्यामधील पुरुषांची संख्या 11,24,069 आहे आणि स्त्रियांची संख्या 10,96,478 आहे व उरलेली मुले आहेत, तर त्या शहरातील मुलांची संख्या किती ?
3. कारखान्याच्या व्यवस्थापनाकडे 25,40,600 रुपये एवढा कामगार कल्याण निधी होता. त्यातील 12,37,865 रुपये वैद्यकीय बाबींवर व 8,42,317 रुपये कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी खर्च केले व शिल्लक निधी उपाहारगृहासाठी राखून ठेवला, तर उपाहारगृहासाठी किती निधी राखून ठेवला ?
4. क्रिकेटच्या सामन्यासाठी पहिल्या दिवशी 13,608 तिकिटे, दुसऱ्या दिवशी 8,955 तिकिटे आणि तिसऱ्या दिवशी काही तिकिटे विकली गेली. तीन दिवसांत एकूण 36,563 तिकिटे विकली गेली, तर तिसऱ्या दिवशी किती तिकिटे विकली गेली ?

add & subtract. Revision

In these examples, both operations, addition and subtraction, have to be done. They are done in the order in which they are given. In actual cases, we need to consider the specific problem to decide which operation must be done first.

Example (3) The total amount spent on building a certain house was ₹ 87,14,530. Of this amount, ₹ 24,72,615 were spent on buying the plot of land, ₹ 50,43,720 on the construction material and the rest on labour charges. What was the amount spent on labour?

Method : 1

	8714530	⟶ Total amount spent
−	2472615	⟶ Cost of plot
	6241915	⟶ Cost of material and labour

	6241915	⟶ Cost of material and labour
−	5043720	⟶ Cost of material
	1198195	⟶ Amount spent on labour

Method : 2

	2472615	Cost of plot
+	5043720	Cost of material
	7516335	Cost of plot and material

	8714530	Total amount spent
−	7516335	Cost of plot and material
	1198195	Amount spent on labour

Let us verify our answer.

	2472615	⟶ Cost of plot
+	5043720	⟶ Cost of material
+	1198195	⟶ Amount spent on labour
	8714530	⟶ Total cost

The sum total of all the amounts spent tallies with the given total cost. It means that our answer is correct.

Problem Set 13

1. The Forest Department planted 23,078 trees of *khair,* 19,476 of *behada* besides trees of several other kinds. If the Department planted 50,000 trees altogether, how many trees were neither of *khair* nor of *behada*?

2. A city has a population of 37,04,926. If this includes 11,24,069 men and 10,96,478 women, what is the number of children in the city?

3. The management of a certain factory had 25,40,600 rupees in the labour welfare fund. From this fund, 12,37,865 rupees were used for medical expenses, 8,42,317 rupees were spent on the education of the workers' children and the remaining was put aside for a canteen. How much money was put aside for the canteen?

4. For a three-day cricket match, 13,608 tickets were sold on the first day and 8,955 on the second day. If, altogether, 36,563 tickets were sold in three days, how many were sold on the third day?

listen and understand. सराव करा.

टेस्ट सोडवा

Cuckoo

1. Listen, repeat and sing. ऐका, म्हणा. हे गाणे म्हणा. O1

Unit Two

व्हिडिओ पहा

Cuckoo, cuckoo,
What do you do?

In April
I open my bill;

In May
I sing all day;

In June
I change my tune;

In July
Away I fly;

In August
Go, go I must.

2. Find the rhyming words in the poem. कवितेतील यमक जुळणारे शब्द शोधा. O10

3. Listen to the names of months. Tick the ones that are there in this poem. महिन्यांची नावे ऐका. कवितेत आलेल्या महिन्यांना अशी (✓) खूण करा. O2

4. Copy the names of months. Write these names in Marathi alongside. महिन्यांची नावे पाहून लिहा. हीच नावे बाजूला मराठीतून लिहा. W10

January	February	March	April	May	June
July	August	September	October	November	December

वाचा व समजून घ्या. सराव

टेस्ट सोडवा

४. पर्यावरणाचे संतुलन

करून पहा.

तुमच्या घरातल्या वडीलधाऱ्यांबरोबर परिसरातील नदी, तलाव, ओढा अशा एखाद्या ठिकाणी जा.

सजीवांचे निरीक्षण

तेथे दिसणाऱ्या सजीवांची यादी करा. तेथील ज्या सजीवांची नावे तुम्हांला माहीत नसतील त्यांची चित्रे काढून किंवा त्यांचे आकार, रंग, आवाज, निवारे यांविषयीची निरीक्षणे वहीत नोंदवा. प्राणी आणि वनस्पतींचे एकूण किती प्रकार दिसले ते मोजा.

आता तुमच्या घराभोवती, शाळेच्या बागेत किंवा जवळच्या शेतात जाऊन हीच कृती पुन्हा करा.

सांगा पाहू !

(१) जे सजीव प्रत्यक्ष दिसले नाहीत, पण ते तिथे होते किंवा येऊन गेले अशा प्रकारच्या त्यांच्या काही खुणांचे निरीक्षण तुम्ही केले का? उदाहरणार्थ, अर्धवट खाल्लेली फळे, शेंगा, गळलेली पिसे, पाऊलखुणा, शेण, लेंड्या, घरटी, कोश, अंडी, मधाचे पोळे इत्यादी.

(२) सूक्ष्मजीवांचे निरीक्षण करणे तुम्हांला शक्य झाले का?

(३) तुम्ही गेलेल्या ठिकाणी एकूण किती प्रकारचे सजीव दिसले? तुमच्या निरीक्षणाच्या वेळी तिथे राहणारे सर्व प्रकारचे सजीव तुम्हांला दिसले होते, असे वाटते का? पाण्याच्या ठिकाणी, शेतात किंवा बागेत आढळलेले सजीव वेगवेगळे होते की तेच होते?

एखाद्या भागात आढळणाऱ्या सजीवांमध्ये जी विविधता दिसते, तिला तेथील 'जैवविविधता' म्हणतात.

सांगा पाहू !

तुम्ही सजीवांचे निरीक्षण केले. त्यांपैकी कोणत्या ठिकाणी अधिक जैवविविधता दिसली?

एखाद्या क्षेत्राच्या जैवविविधतेचा अभ्यास करण्यासाठी वैज्ञानिक जी निरीक्षणे करतात, त्यांची संख्या खूप मोठी असते. दिन-रात्र, विविध ऋतू अशा सर्व परिस्थितींमध्ये शास्त्रज्ञ नोंदी घेतात. खूप उंचावरच्या भागात व खोल पाण्यात राहणाऱ्या सजीवांचे, तसेच सूक्ष्मजीवांचे निरीक्षण करण्यासाठी ते विशेष साधने वापरतात. अनेक वैज्ञानिकांनी केलेली निरीक्षणे जमा केली जातात. त्यांचा पुन्हा अभ्यास केला जातो. असे सर्व प्रयत्न दीर्घकाळपर्यंत केले जातात, तेव्हा कुठे वैज्ञानिकांना एखाद्या प्रदेशातील जैवविविधतेची खात्री वाटते.

टेस्ट सोडवा

वाचा व समजून घ्या. सराव

३. पृथ्वीवरील सजीव

३.१ पृथ्वीची उत्पत्ती

३.२ पृथ्वीवरील सजीवांची निर्मिती

३.३ पृथ्वीवरील प्राणिसृष्टी

३.१ पृथ्वीची उत्पत्ती

आपणा सगळ्यांनाच काही प्रश्न पडतात. उदा., आपण सर्व ज्या पृथ्वीवर राहतो, ती पृथ्वी कशी घडली, केव्हा घडली? ती आता जशी आहे, तशी पहिल्यापासून होती की बदलली? ती बदलली असेल, तर तिच्यामध्ये नेमके कोणते बदल झाले?

पृथ्वी

शास्त्रीय संशोधनाच्या आधारे असे मानले जाते, की सुमारे साडेचार अब्ज वर्षांपूर्वी अत्यंत तप्त वायू आणि धूळ यांनी मिळून बनलेला, एक प्रचंड मोठा गतिमान ढग अवकाशात निर्माण झाला. त्याच्या अत्यंत वेगवान, चक्राकार गतीमुळे त्याचे विभाजन होऊन सूर्य आणि सूर्याभोवती फिरणारे ग्रह निर्माण झाले. त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत : १.बुध २.शुक्र ३.पृथ्वी ४.मंगळ ५.गुरू ६.शनी ७.युरेनस ८.नेपच्यून.

३.२ पृथ्वीवरील सजीवांची निर्मिती

या सर्व ग्रहांपैकी पृथ्वीवर सजीव सृष्टी आहे. पृथ्वीच्या उत्पत्तीनंतर तिचा पृष्ठभाग थंड होऊन तिच्यावर जलाशयांची निर्मिती होण्यासाठी जवळजवळ ८० कोटी वर्षे लागली. असे मानले जाते, की पाण्यामध्ये प्रथम अनेक प्रकारचे एकपेशीय सजीव निर्माण झाले. 'आदिजीव' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या एकपेशीय सजीवांपासून हळूहळू बहुपेशीय सजीव निर्माण झाले. एकपेशीय सजीव अत्यंत सूक्ष्म असतात. ते नुसत्या डोळ्यांनी दिसत नाहीत. त्यांना पाहण्यासाठी सूक्ष्मदर्शकाची गरज असते.



सूक्ष्मदर्शकातून दिसणारा एकपेशीय सजीव



सूक्ष्मदर्शक

● देखो, सुनो और बनाओ :

रियाज

७. बधाई कार्ड



सामग्री – कागज, पुरानी साड़ी की लेस, टिकलियाँ, रंगीन काँच के छोटे-छोटे टुकड़े, कैंची, गोंद ।

कृति – बधाई कार्ड के लिए आवश्यक आकार में कागज को काटो । पुरानी साड़ी की लेस को काट कर चारों किनारों में चिपकाओ । कार्ड को आकर्षक बनाने के लिए टिकलियों और काँच के छोटे-छोटे टुकड़ों को उचित जगहों पर चिपकाओ । स्केच पेन से विविध रंगों की सजावट करो । बधाई का संदेश देखकर लिखो ।

❑ विद्यार्थियों को उनके मित्र/सहेली के जन्मदिन एवं अन्य अवसरों पर हाथ से बनाकर बधाई कार्ड भेजने के लिए कहें । बड़ों के लिए प्रणाम, नमस्कार, नमस्ते और छोटों के लिए आशीष, स्नेह, प्यार जैसे शब्दों से विद्यार्थियों को परिचित कराएँ ।

स्वयंमूल्यमापन चाचणी पहा खालील लिंकवर..

पहिली	दुसरी	तिसरी	चौथी	पाचवी	सहावी	सातवी
क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा

माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरून

पाचवी मराठी	पाचवी गणित	सेमी गणित	पाचवी इंग्रजी	पाचवी प.अ-1	पाचवी प.अ-2	हिंदी
क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक

दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.

पहिली	दुसरी	तिसरी	चौथी	पाचवी	सहावी	सातवी
क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा

इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरून...

पहिली	दुसरी	तिसरी	चौथी	पाचवी	सहावी	सातवी
क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा

MiniShala शैक्षणिक ॲप्स खालील लिंकवरून डाऊनलोड करा.

पहिली	दुसरी	तिसरी	चौथी	पाचवी	सहावी	सातवी
		आठवी	नववी	दहावी		

गुरुमाऊली शैक्षणिक ॲप्स – Click Here

निर्मिती - श्री.प्रविण डाकरे, श्री.जयदिप डाकरे   वेब स्त्रोत-'ई-बालभारती'   सौजन्य- जिल्हा परिषद कोल्हापूर

https://www.gurumauli.in